पंडित दीनदयाल उपाध्याय
स्वयम् योजनेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२**
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक:-१५ ऑक्टोबर, २०१६.

**प्रस्तावना :-**

आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखाली अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता राज्यात एकूण ४९५ वसतीगृहे मंजुर असून त्यांची एकूण प्रवेश क्षमता ६१०७० इतकी आहे. त्यापैकी ४९१ शासकीय वसतीगृहे कार्यरत असून त्यापैकी २८३ वसतीगृहे ही मुलांची व २०८ वसतीगृहे ही मुलींची आहेत, या वसतीगृहांची क्षमता ५८४९५ इतकी आहे. राज्यात विविध ठिकाणी महाविद्यालये, उच्च महाविद्यालये, तंत्रनिकेतन, वैद्यकीय महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, आय.टी.आय, अल्प मुदतीचे कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम इत्यादिंची सोय झाली आहे. सदर उच्च शैक्षणिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सदर विद्यार्थी ग्रामीण तसेच दुर्गम क्षेत्रातून तालुक्याच्या/ जिल्ह्याच्या/ विभागीय मुख्यालय/ महानगरांच्या ठिकाणी शिक्षणासाठी येतात. मात्र त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना या ठिकाणी निवास, भोजन तसेच इतर शैक्षणिक खर्च परवडत नसल्याने त्यांना अशा सुविधा मोफत पुरविण्यासाठी विभागांतर्गत शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश देण्यात येतो.

मात्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याने शासकीय वसतिगृहांतील उपलब्ध प्रवेश क्षमता कमी पडत आहे. मागील ३ शैक्षणिक वर्षामध्ये वसतीगृह प्रवेशासाठी सरासरी ७५००० अर्ज प्राप्त होत आहेत. याप्रकरणी विभागाच्या कार्यान्वित वसतीगृहांची प्रवेश क्षमता ५८४९५ असल्याने वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या वसतीगृह प्रवेशासाठी विविध लोकप्रतिनीधी, विविध विद्यार्थी संघटना तसेच क्षेत्रिय कार्यालयांकडून नवीन वसतीगृहे मंजूर करण्याबाबत तसेच वसतीगृहांची प्रवेश क्षमता वाढविण्याबाबत सतत मागणी होत आहे. तथापि, नवीन वसतीगृहे मंजूर करणे, वसतीगृह प्रवेशाच्या क्षमतेत वाढ करणे, त्याकरिता भाड्याच्या इमारती शोधणे तसेच नवीन कर्मचारी नियुक्ती करणे इत्यादी बाबींकरिता होणारा विलंब तसेच राज्य शासनावरील अनावर्ती भांडवली खर्च टाळण्यासाठी सद्यस्थितीत कार्यरत वसतीगृहांमध्ये प्रवेशासाठी अर्ज करूनही प्रवेश न मिळणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी थेट रक्कम वितरण करण्याबाबत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अनुसूचित जमातीच्या शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता १२ वी नंतरच्या उच्च शिक्षणाकरीता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत **"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना"** राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सद्यस्थितीत शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या एकूण २०,००० विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**३.** तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश घेणे किंवा **पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम्** योजनेचा लाभ घेणे हे दोन पर्याय विद्यार्थ्याकडे उपलब्ध राहणार आहेत. सबब आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीतील शासकीय वसतीगृहातील एकूण मंजूर प्रवेश क्षमता ६१,०७० व **पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम्** योजनेंतर्गतची क्षमता २०,०००, अशा एकूण ८१,०७० एवढ्या क्षमतेच्या कमाल ५० टक्के मर्यादेत सन २०१७-१८ पासून विद्यार्थ्यांना पसंतीनुसार व गुणानुक्रमाने **"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम्"** योजनेचा लाभ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**४.** सदर योजनेंतर्गत खालील ३ प्रकारे वर्गीकरण केलेल्या शहरांमधील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या तथापि, शासकीय वसतीगृहात प्रवेशीत नसलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इ. १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेण्याकरिता वार्षिक खर्चासाठी खालीलप्रमाणे निश्चित केलेनुसार विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्यात यावी.

| **अ.क्र** | **खर्चाची बाब** | **मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम** | **इतर महसुली विभागीय मुख्यालय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम** | **इतर जिल्हयाचे ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,००० | २८,००० | २५,००० |
| २ | निवास भत्ता | २०,००० | १५,००० | १२,००० |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,००० | ८,००० | ६,००० |
| | **प्रती विद्यार्थी एकूण संभाव्य वार्षीक खर्च** | **६०,०००** | **५१,०००** | **४३,०००** |

**टीप** - वरील रक्कमे व्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रु.५,०००/- व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी रु.२,०००/ इतकी रक्कम **शैक्षणिक साहित्यासाठी** ठोक स्वरुपात देण्यात येईल.

**५. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी खालीलप्रमाणे निकष असतील.**

**अ) मुलभूत पात्रता**

(१) विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. विद्यार्थ्यांने अर्जासोबत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

(२) विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षीक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

(३) विद्यार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संल्लग्न करणे बंधनकारक राहील.

(४) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्याथ्याचे पालक रहिवाशी नसावेत.

(५) सदर योजनेचा लाभ मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांने संबंधित शहरामध्ये राहणे आवश्यक राहील.

**ब) <u>शैक्षणिक निकष</u>**

(१) सदरचा विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.

(२) केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही.

(३) एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. यामध्ये प्रथम पदवी पूर्ण न करता दुसऱ्या पदवीसाठी प्रवेश मिळाल्यास सुध्दा लाभ घेता येणारा नाही.

(४) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयात/संस्थेमध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.

(५) विद्यार्थ्याची संस्थेमधील / महाविद्यालयातील उपस्थिती ८० टक्केपेक्षा अधिक असणे आवश्यक राहील.

(६) विद्यार्थ्यांची निवड करताना गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

(७) निवड करण्यात आलेल्या विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**क) <u>इतर निकष</u>**

(१) योजनेचा लाभ १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास देण्यात येईल. तथापि एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ७ वर्षे सदर योजनेचा लाभ घेता येईल. सदर योजनेचा ७ वर्षे लाभ घेतल्यानंतर त्या विद्यार्थ्यास वसतीगृहात प्रवेश मिळणार नाही.

(२) सदर योजनेस पात्र विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास योजनेंतर्गत लाभ देण्यात येणार नाही.

(३) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे कमाल वय २८ वर्षापेक्षा अधिक नसावे.

(४) योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने आदिवासी विकास विभागाच्या संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

(५) विद्यार्थ्यास आदिवासी विकास विभागाच्या, सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतीगृहामध्ये मोफत प्रवेश मिळालेला नसावा.

(६) विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा.

(७) आदिम जमातीच्या व अनुसुचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ प्राथम्याने देय राहील.

**६. सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अनुदान वितरण करण्यात यावे :-**

(१) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर योजनेंतर्गत अनुज्ञेय रक्कमेपैकी भोजन व निवासभत्त्याची रक्कम प्रत्येक तिमाहीस आगावू देण्यात येईल. मात्र सदर योजनेची संगणक प्रणाली विकसित झाल्यानंतर आणि योजना सुरळीतपणे सुरू झाल्यांनंतर भोजन व निवास भत्त्याची रक्कम प्रत्येक महिन्याला आगावू देण्यात येईल.

(२) तथापि, शैक्षणिक साहित्याकरिता विहित केलेली रक्कम शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीला एकदाच देण्यात येईल.

(३) सदर योजनेंतर्गत निवड होणाऱ्या विद्यार्थ्यास आहार व निवास सुविधा मोफत उपलब्ध करण्यात येत असल्याने भारत सरकार पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती मार्गदर्शक सूचनांनुसार अशा विद्यार्थ्यास १/३ या दराने निर्वाहभत्ता अनुज्ञेय राहील. त्यानुसार अशा पात्र विद्यार्थ्यास केंद्र शासनाचा अनुज्ञेय १/३ निर्वाह भत्ता अदा केल्यानंतर **"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम्"** योजनेतंर्गत शहरप्रकारानुसार निश्चित करण्यात आलेला संपूर्ण निर्वाहभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. अशा विद्यार्थ्यास केंद्र शासन पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती अंतर्गत १/३ निर्वाह भत्ता वजा जाता उर्वरित फरकाची निर्वाह भत्ता रक्कम अनुज्ञेय राहील.

(४) विद्यार्थ्याची संस्थेमधील / महाविद्यालयातील उपस्थिती ८० टक्केपेक्षा अधिक असणे आवश्यक राहील. त्याबाबत प्रत्येक तिमाहिस संबंधित शिक्षण संस्थेकडून उपस्थिती पत्रक ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करणे बंधनकारक राहील. सदर प्रमाणपत्राच्या आधारेच पुढील अनुज्ञेय रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

(५) या योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न केलेल्या राष्ट्रीयकृत बँक खात्यात संबधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्यामार्फत अनुज्ञेय रक्कम थेट वितरीत करण्यात येईल.

**७.** (१) सदर योजनेमध्ये विद्यार्थी व शैक्षणिक संस्थांनी फसवणूक केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्याने शिक्षण न घेता नोकरी /व्यवसाय करुन या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यावर देखील असा विद्यार्थी कारवाईस पात्र राहील व अशा लाभ धारकास योजनेंतर्गत अदा करण्यात आलेली रक्कम व्याजासह वसुली करण्यात येईल.

(२) या योजनेचा लाभ घेत असलेला विद्यार्थी अनधिकृतपणे विभागाच्या किंवा अन्य विभागाच्या वसतीगृहामध्ये राहत असल्याचे आढळल्यास त्याला सदर योजनेच्या लाभाकरिता / वसतीगृह प्रवेशाकरिता अपात्र ठरवून त्याचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच फसवणुकीबाबत त्याचे संबंधित शिक्षण संस्थेतील प्रवेश रद्द करण्याबाबतही शिफारस करण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१६६/व्यय-१४, दि.१२/०९/२०१६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१६१०१८१२३०५६४२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2016.10.18 12:32:32 +05'30'

**( सु.ना.शिंदे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री , आदिवासी विकास विभाग, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री , आदिवासी विकास विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
७. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
८. अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुगधव्यवसाय व मत्स्यविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.प्रधान सचिव, सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
१५.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१६.आयुक्त आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१७.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१८. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती.
१९.सर्व उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२१.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२२. निवड नस्ती (का-१२), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन
# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
## समाज कल्याण आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे ४११००१
दूरध्वनी क्रमांक: ०२०-२६१२७५६९ ई-मेल: swadhar.swho@gmail.com

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

**अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणे**
**(६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांसाठीच)**

दिवसेंदिवस वाढत असलेली व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या आणि तेथे प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात, राज्यात शासकीय वसतीगृहांची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक प्रवेशास मर्यादा येत आहेत. शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना तात्काळ वसतीगृह सुरू करून तेथे प्रवेश देण्यावर, जागेची उपलब्धता व बांधकामासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता मर्यादा येतात. अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधीत अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यासाठी शासनाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केलेली आहे. या योजनेसाठी विद्यार्थ्यांना १०वी / १२वी / पदवी /पदवीका परिक्षेमध्ये ६० % पेक्षा जास्त गुण असणे अनिवार्य आहे. **अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ही मर्यादा ५०% असेल.** ( शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२, दिनांक ६.१.२०१७).

या योजनेअंतर्गत राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर (इयत्ता ११ वी, पदवी, पदव्युत्तर पदवी) शिक्षण घेण्यासाठी शासकीय वसतीगृहात प्रवेशित नसणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक खर्चासाठी खालीलप्रमाणे रक्कम संबंधीत विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बॅक खात्यामध्ये वितरीत करण्यात येईल.

| अ.क्र. | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपुर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसुल विभागीय शहरातील व उर्वरित "क" वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम | उर्वरित ठिकाणी उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२००० | २८००० | २५००० |
| २ | निवास भत्ता | २०००० | १५००० | १२००० |
| ३ | निर्वाह भत्ता | ८००० | ८००० | ६००० |
| **एकुण** | | ६०००० | ५१००० | ४३००० |
| **टिप:- वरील रकमेव्यतिरिक्त वैद्यकिय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रु.५०००/- व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु.२०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरुपात देण्यात येईल.** | | | | |

- सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी निकष, अटी व शर्ती या अर्जासोबत जोडलेल्या आहेत. त्याचे विद्यार्थी व पालकांनी अवलोकन करावे. निकष, अटी व शर्ती पुर्ण करणा-या विद्यार्थ्यांनीच अर्ज भरावेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जाचा विहीत नमुना खालील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

  संकेतस्थळ: https://mahaeschol.maharashtra.gov.in
  https://sjsa.maharashtra.gov.in
  https://www.maharashtra.gov.in

- तो संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावा आणि अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या यादीसह तो **विद्‌यार्थ्याचे जातीचे प्रमाणपत्र ज्या जिल्हयातुन काढलेले आहे त्या जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयामध्ये समक्ष / टपालाद्‌वारे / कार्यालयाच्या ई-मेल वर दिनांक 16 मार्च 2017 पर्यंत दाखल करावा.** अधिक माहितीसाठी संबंधीत जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा. जिल्हा कार्यालयाचा पत्रव्यवहाराचा पत्ता, दुरध्वनि, ई-मेल दर्शविणारी यादी सोबत जोडलेली आहे.
- अपुर्ण भरलेले अर्ज आणी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे नसलेले अर्ज रद्द समजण्यात येतील.
- ६०% पेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ही मर्यादा ५०% असेल.
- जिल्हा निहाय अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात किती विद्यार्थ्यांना हा लाभ द्यावयाचा ही संख्या निश्चित केलेली असुन त्यापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
- निवडयादी संबंधीत जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयामार्फत प्रसिध्द केली जाईल. निवड न झालेल्या विद्यार्थ्यांना वेगळे कळविण्यात येणार नाही.
- सदर अर्ज भरण्याची अखेरची मुदत १६ मार्च २०१७ पर्यंत असेल.

**(पीयूष सिह)**
**आयुक्त, समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

# <u>योजनेचे निकष, अटी व शर्ती पुढीलप्रमाणे</u>

**<u>सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी खालील प्रमाणे निकष असतील</u>**

सन २०१६-१७ करिता सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विदयार्थी संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे अर्ज सादर करतील. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण हे अर्जाची छानणी करतील व त्यांची गुणवत्ता यादी जिल्हानिहाय तयार करुन पात्र लाभार्थ्यांना त्याने घेतलेल्या प्रवेशाचे जिल्हयातील जवळचे मागासवर्गीय मुला/मुलींचे वसतिगृहांशी संलग्न (attach) करतील. सामाजिक न्याय विभागाने ठरवून दिलेल्या पध्दतीने या योजने साठी अर्ज करावा लागेल.

**<u>विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे असेल:</u>**

- सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थी अनुसुचित जाती व नवबौध्द या प्रवर्गाचा असावा.
- त्याने जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.
- विद्यार्थी महाराष्ट्राचा रहीवासी असावा.
- विद्यार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक त्याने ज्या राष्ट्रीयकृत/ शेड्युल्ड बँकेत खाते उघडले आहे त्या खात्याशी संलग्न करणे बंधनकारक असेल.
- विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रु. २,५०,०००/- (अक्षरी रूपये दोन लाख पन्नास हजार फक्त) पेक्षा जास्त नसावे.
- विद्यार्थी स्थानिक नसावा. (विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या ठिकाणी आहे, अशा ठिकाणचा सदर विद्यार्थी रहिवासी नसावा)
- विद्यार्थी इ. ११वी, १२वी आणि त्यानंतरचे दोन वर्षापेक्षा कमी कालावधी नसलेल्या अभ्यासक्रमासाठी उच्च शिक्षण घेणारा असावा.
- इ. ११वी आणि १२ वी मध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यास १०वी मध्ये किमान ६०% गुण असणे अनिवार्य असेल.
- इ.१२ वी नंतरच्या दोन वर्षाकरीता जास्त कालावधी असलेल्या पदवीका किंवा पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास इ. १२ वी मध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण असणे अनिर्वाय आहे.
- दोन वर्षापेक्षा कमी कालावधी नसणा-या कोणत्याही मान्यता प्राप्त अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक वर्षी किमान ६०% गुण किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन/ CGPA चे गुण असणे आवश्यक राहील.
- इ.१२ वी नंतर पदवीका, पदवी अभ्यास क्रमासाठी प्रवेश घेणारा अभ्यासक्रम हा दोन वर्षापेक्षा आणि पदवीनंतर पदव्युत्तर पदवी / पदवीका अभ्यासक्रमाचा कालवधीही दोन वर्षापेक्षा कमी नसावा.
- विद्यार्थ्याने राज्य शासन, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, भारतीय वैद्यकिय शिक्षण परिषद / वैद्यकिय परिषद, भारतातील फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, कृषी परिषद, महाराष्ट्र तंत्रशिक्षण परिषद वा तत्सम सक्षम प्राधीकारी यांच्या मार्फत मान्यता प्राप्त महाविद्यालया मध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला असावा.
- विद्यार्थ्याची निवड गुणवत्तेनुसार करण्यात येईल. निवडलेला विद्यार्थी संबंधीत अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील.

- या योजनेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ३% आरक्षण असेल, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तेची किमान टक्केवारीची मर्यादा ५०% इतकी राहील.
- प्रवेशित विद्यार्थ्यांस प्रत्येक सत्र परिक्षेचा निकालाची प्रत निकाल लागल्यापासून १५ दिवसांचे आत नेमून दिलेल्या कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहिल.
- सदर योजनेचा लाभ प्रवेशित अभ्यासक्रमांच्या कालावधीपर्यतच देय राहिल. या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना एकुण शैक्षणिक कालावधीत जास्तीत जास्त ७ वर्षापर्यंत घेता येईल.
- विद्यार्थ्याने खोटी माहिती व कागदपत्रे देऊन सदर योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास किंवा शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करित असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास तो कारवाईस पात्र राहील. तसेच त्यास दिलेल्या रकमेची १२ टक्के व्याजासह वसुली केली जाईल.
- या योजनेचा लाभ मंजूर झाल्यानंतर विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी किमान ६० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे अन्यथा तो या योजनेस अपात्र होईल.

**लाभाचे वितरण:**

- विद्यार्थ्यांचा प्रवेश ज्या वसतिगृहाशी संलग्न करण्यात आला आहे त्या वसतिगृहाचे गृहप्रमुख/ गृहपाल विद्यार्थ्यांने घेतलेल्या प्रवेशाच्या ठिकाणी म्हणजे संबंधीत महाविद्यालयाकडुन उपस्थितीचा अहवाल प्राप्त करुन संबंधीत जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना सादर करतील व संबंधीत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी सदर योजनेतील पात्र प्रत्येक तिमाही उपस्थितीच्या आधारे अनुज्ञेय रक्कम त्या विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये DBT Portal मार्फत जमा करतील. विद्यार्थ्यांच्या बँक खात्याशी त्यांचा आधार कार्ड क्रमांक संलग्न करण्यात येईल.
- DBT Portal सुरु होईपर्यत प्रचलित पध्दतीने सदरचा लाभ विद्यार्थ्यांच्या नांवे RTGS पध्दतीने त्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांने संबधित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतल्यानंतर सदर योजनेंतर्गत अनुज्ञेय होणाऱ्या रक्कमेपैकी पहिल्या तिमाहीची रक्कम आगाऊ देण्यात येईल.
- या योजनेंतर्गत लाभास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांस भारत सरकार शिष्यवृत्ती अंतर्गत प्राप्त होत असलेल्या निर्वाह भत्याची रक्कम वजावट करुन उर्वरित रक्कम निर्वाह भत्ता म्हणून अदा करण्यात येईल.
- जे विद्यार्थी व्यवसायिक पाठयक्रमाशी संलग्न निर्वाह भत्ता या योजनेचा लाभ घेत असतील त्यांना या योजनेतील निर्वाह भत्याचा लाभ मिळणार नाही.
- विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती किमान ७५ % असणे आवश्यक राहील, याबाबत संबंधित संस्थेच्या प्राचार्यांकडून प्रत्येक तिमाही उपस्थितीबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनासाठी सन 2016-17 वर्षाकरिता अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांने करावयाच्या अर्जाचा नमुना**

अर्ज दाराचा फोटो

**आवेदनपत्र भरण्यापुर्वी ते काळजीपुर्वक वाचुन भरावे**

| कार्यालयाने भरावयाची माहिती | | | |
|---|---|---|---|
| आवेदनपत्र आवक क्रमांक | गुणवत्ता यादीतील क्रमांक | गुण | टक्केवारी |
| | | एकूण गुण ..................<br>मिळालेले गुण ............. | |

प्रति,
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, ...............................

महोदय / महोदया

मी **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा** लाभ मिळणेसाठी माझे आवेदन पत्र सादर करीत आहे. आवदेनपत्रात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार खरी आहे. मी सदर योजनेच्या सर्व अटी व शर्ती पुर्णपणे वाचलेल्या असून त्या मला अवगत झाल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळाल्यास मी सदर योजनेसाठी लागु असलेल्या नियमांचे /अटींचे कसोशिने पालन करीन अशी मी हमी देत आहे.

मी खोटी माहिती व कागदपत्रे देऊन लाभ घेतल्यास किंवा शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करीत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास मी कारवाईस पात्र राहील. तसेच सदर योजनेअंतर्गत मला मिळालेली रक्कम (१२टक्के) व्याजासह शासनास परत करेन याची मला जाणीव आहे.

स्थळ :- आपला/आपली विश्वासू

दिनांक :-

(अर्जदाराची स्वाक्षरी)

अर्जदाराचे नांव ...............................
मोबाईल क्रमांक ...............................
आधार क्रमांक .................................

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनाकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना

| | |
|---|---|
| **अर्जदाराची माहिती:** | |
| अ) १) अर्जदार विद्यार्थ्याचे संपुर्ण नांव :- आडनाव ..........................स्वत:चे नांव .......................... वडिलांचे नांव............... | |
| २) वडिलांचे पुर्ण नाव :- आडनाव ................स्वत:चे नांव ............... वडिलांचे नांव............... | |
| ३) अर्जदार विद्यार्थीनी विवाहीत असेल तर पतीचे नाव व पत्ता:- | |
| ४) आईचे पुर्ण नाव: - | |
| ५) जात व प्रवर्ग:- | |
| ६) (i) अर्जदाराचे मुळ राहण्याचे ठिकाण व पत्र व्यवहाराचा पुर्ण पत्ता (पिनकोडसह) | घर क्रमांक ............. रस्ता/ गल्ली ............................. जवळची खूण .................. गाव/शहर ....................... तालुका .................... जिल्हा ................................ पिन क्रमांक ................................ |
| (ii) उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी यांनी दिलेला रहिवासी दाखला | प्रमाणपत्र क्रमांक ............... दिनांक ......................... कार्यालयाचे नाव .................................................... |
| ७) अर्जदाराचा मोबाईल क्रमांक<br>असल्यास दूरध्वनी क्रमांक (एसटीडी कोडसह) | ..........................................<br>.......................................... |
| ८) अर्जदार दिव्यांग आहे काय?<br>दिव्यांगत्वाचा प्रकार<br>टककेवारी | .......................................<br>.......................................<br>........................................ |
| **ब) जातीच्या दाखल्याचा तपशिल :-** | |
| (i) अर्जदाराने ज्या जिल्ह्यातून जातीचा दाखला काढला आहे त्या जिल्ह्याचे नांव. | ..................................... |
| (ii) अनु.जाती व नवबौध्द असल्याबाबतचे उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्रातील माहिती | प्रमाणपत्र क्रमांक ........... जारी केल्याचा दिनांक ......... जात ............................गांव ................................ तालुका ......................... जिल्हा ............................ |
| **क) आधार कार्डाचा तपशिल :-** | |
| (i) अर्जदाराचा आधार कार्ड क्रमांक | |
| (ii) आधारकार्डावरील पत्ता | |

| | |
|---|---|
| **ड) बँकेचा तपशिल :-** | |
| (१) राष्ट्रीयकृत/ शेड्यूल्ड बॅकेचे नांव | |
| (२) शाखा | |
| (३) खाते क्रमांक | |
| (४) I.F.S.C. कोड | |
| (५) बॅक खाते आधारकार्डाशी संलग्न केल्याबाबतचा पुरावा | |
| **इ) प्रवेशित महाविद्यालयाची माहिती :-** | |
| १) ज्या महाविद्यालयात अर्जदाराने प्रवेश घेतलेला आहे त्या महाविद्यालयाचे नांव | |
| २) महाविद्यालयाचा पत्ता | |
| ३) महाविद्यालयाने विद्यार्थ्यास दिलेला प्रवेश नोंदणी क्रमांक/ सर्वसाधारण नोंदवहीतील नोंद क्रमांक/ ओळखपत्र क्रमांक | |
| **फ) प्रवेशित अभ्यासक्रमाची माहिती :-** | |
| १) अभ्यासक्रमाचे नाव | |
| २) प्रवेशित वर्ष | (पहिले/ दुसरे/ तिसरे/ चौथे/ पाचवे) |
| ३) प्रवेश दिनांक व वर्ष | |
| ४) अभ्यासक्रमाचा कालावधी (किती वर्षाचा अभ्यासक्रम) | |
| ५) अभ्यासक्रम- पदवी/पदविका/ पदव्युत्तर (इतर असल्यास नोंद करावे.) | |

**ग) गुणाची टक्केवारी :-**

| | प्रवेश वर्ष व दिनांक | उत्तीर्ण महिना व वर्ष | एकूण गुण | एकूण पैकी प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| इयत्ता १० वी | | | | | |
| इयत्ता १२ वी | | | | | |
| पदवी | | | | | |

टिप: १) गुणांच्या ऐवजी ग्रेडेशन असल्यास ग्रेडेशन नुसार येणारी टक्केवारी द्यावी.
२) जे लागू नसेल ते खोडावे.

| | | |
|---|---|---|
| ह) | (i) अर्जदाराने अनु.जातीच्या विद्यार्थ्यांसाठी देय असणाऱ्या शिष्यवृत्ती/ शैक्षणिक परिक्षा फी योजनेचा लाभ घेतला आहे का? | होय / नाही |
| | (ii) घेतला असल्यास त्याचा यूजर आय.डी. क्रमांक | |

**अर्जदाराच्या पालकांची माहिती:**

| | |
|---|---|
| १) पालकांचे पुर्ण नाव | |
| २) पालकाचे अर्जदारांशी असलेले नाते | |
| ३) वडिल जिवीत नसल्यास त्यांचे मृत्यूचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी | |
| ४) पालकांचा व्यवसाय. | |
| ५) जेथे व्यवसाय करतात तेथील पत्रव्यवहाराचा पत्ता. | |
| ६) पालकांचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न. (तहसिलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा जेथे सेवा करीत असतील तेथील कार्यालय प्रमुखाने प्रमाणित केलेल्या वार्षिक वेतन प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.) | रुपये .............................. वर्ष ................................. |

मी दिलेली माहिती खोटी आढळल्यास किंवा माझ्या पाल्याने शैक्षणिक अभ्यासक्रम पुर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करीत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास माझ्या पाल्यास सदर योजनेचा मिळत असलेला लाभ रदद होईल, याची तसेच अशा प्रकरणी सदर योजनेअंतर्गत माझ्या पाल्यास मिळालेली रक्कम १२टक्के व्याजासह मी शासनास परत करीन अशी लेखी हमी देत आहे.

स्थळ: ................................
दिनांक: ..............................

साक्षीदार-
नांव: १) .................................. स्वाक्षरी .................
२) .................................. स्वाक्षरी .................

पालकाची स्वाक्षरी

# R.T.G.S. साठी विद्यार्थ्यांनी भरुन द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना

| | | |
|---|---|---|
| **१.** | **विद्यार्थ्यांचे नांव (खाते पुस्तकानुसार)** | |
| २ | बँकेचे नांव | |
| ३ | शाखेचे ठिकाण | |
| ४ | बँक खाते क्रमांक | |
| ५ | IFSC CODE | |
| ६ | MICR CODE | |
| (सोबत :- बॅकेच्या खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स अथवा रद्द केलेला स्वाक्षांकित धनादेश जोडावा. | | |

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्जासाठी शैक्षणिक संस्थेने द्यावयाची माहिति

| | |
|---|---|
| अ) १) विद्यार्थ्याचे नाव | |
| २) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक संस्थेचे नांव व पुर्ण पत्ता | |
| ३) महाविद्यालय कोणत्या विद्यापीठाशी संलग्न आहे | |
| ४) अर्जदाराने आपल्या महाविद्यालयात कोणत्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे त्या अभ्यासक्रमाचे नाव व त्याचा कालावधी | |
| ५) महाविद्यालयास सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या आदेशाचा क्रमांक व दिनांक | |
| ६) महाविद्यालयाचा पत्ता | |
| ७) महाविद्यालय व्यवस्थापन प्रकार (शासकीय/शासन अनुदानित/खाजगी अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यीत/ अभिमत इत्यादी नोंद करावी) | |
| ८) महाविद्यालयाचा ई-स्कॉलरशिपचा यूजर आय.डी. क्रमांक | |
| ९) विद्यार्थ्याचा प्रवेश नोंदणी क्रमांक / जनरल रजिस्टर नोंदणी क्रमांक | |
| **ब) विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबतची माहिती :-** | |
| (१) अभ्यासक्रमाचे नाव | |
| (२) प्रवेशित वर्ष | (पहिले/ दुसरे/ तिसरे) |
| (३) प्रवेश दिनांक व वर्ष | |
| (४) अभ्यासक्रमाचा कालावधी (किती वर्षाचा अभ्यासक्रम) | |
| (५) व्यवसायिक/ बिगर व्यवसायिक/ उच्च माध्यमिक | |
| (६) प्रकार- (अनुदानित/ विनाअनुदानित) | |
| (७) अभ्यासक्रम- (पदवी/पदविका/ पदव्युत्तर) (इतर असल्यास नोंद करावी) | |

| | |
|---|---|
| (८) आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेताना अर्जदाराने सादर केलेल्या गुणपत्रिकेनुसार त्यास इयत्ता १० वी / १२ वी/ पदवी परिक्षेत मिळालेले एकूण गुण व टक्केवारी | इयत्ता १० वी चे गुण ................ टक्केवारी ..........<br>इयत्ता १२ वी चे गुण ................ टक्केवारी .........<br>पदवीचे गुण ........................... टक्केवारी ......... |
| (९) अर्जदाराने आपल्या महाविद्यालयामार्फत आणखी कोणत्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर केला आहे. | |
| (१०) अर्जदाराने आपल्या संस्थेत प्रवेश घेण्यापूर्वी कोणत्या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेतले होते त्याची माहिती | |
| (११) अर्जदाराने कोणत्या कोट्यातून प्रवेश घेतला. ((मॅनेजमेंट कोटा, CAP, स्पॉन्सर्ड कोटा, मायनॉरीटी, FWS (Fee Waiver Scheme), इतर (नमूद करणे)) | |

स्थळ: ..............................

दिनांक : ...........................

शिक्का

मुख्याध्यापक/ प्राचार्य यांची स्वाक्षरी

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्जासाठीसोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात**

**( मुळ प्रमाणपत्र जोडू नये )**

| | |
|---|---|
| १) जातीचा दाखला | होय / नाही |
| २) महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचा पुरावा ( वय /अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र / रेशन कार्ड / निवडणूक ओळखपत्र /जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला यापैकी एक ) | होय / नाही |
| ३) आधार कार्डाची प्रत | होय / नाही |
| ४) बँकेत खाते उघडल्याचा पुरावा म्हणून पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत किंवा बँक स्टेटमेंटची प्रत किंवा रद्द केलेला चेक. | होय / नाही |
| ५) तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र किंवा वडील नौकरीत असल्यास फॉर्म नंबर१६ | होय / नाही |
| ६) विद्यार्थी दिव्यांग असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र | होय / नाही |
| ७) इ. १० वी, १२ वी किंवा पदवी परिक्षेचे गुणपत्रक | होय / नाही |
| ८) महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट | होय / नाही |
| ९) विद्यार्थीनी विवाहीत असल्यास पतीच्या उत्पन्नाचा पुरावा | होय / नाही |
| १०) बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न केल्याबाबतचा पुरावा | होय / नाही |
| ११) विद्यार्थ्याने कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र | होय / नाही |
| १२) स्थानिक रहिवासी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | होय / नाही |
| १३) विद्यार्थी सध्या जेथे राहतो त्याबाबतचा पुरावा ( खाजगी वसतिगृह, भाडे करारनामा इ. ) | होय / नाही |
| १४) महाविद्यालयाचे उपस्थिती प्रमाणपत्र | होय / नाही |
| १५) सत्र परिक्षेच्या निकालाची प्रत | होय / नाही |

अर्जदाराची स्वाक्षरी

व पुर्ण नाव ............................................

# सहाय्यक आयुक्त जिल्हा समाज कल्याण पत्ते, दूरध्वनी

| अ. क्र. | जिल्हा | अधिकारी नाव | एस.टी. डी. कोड | कार्यालय दूरध्वनी | मोबाईल | कार्यालय पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | श्रीमती एम.एस.शेरे | ०२२ | २५२७५०७३ | ९९८७३१४५१४ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,मुंबई शहर प्रशासकीय भवन ४था मजला आर सी चेंबुरकर मार्ग मुंबई.७१ |
| २ | मुंबई उ. नगर | अविनाश देवसटवार | ०२२ | २५२२२०२३ | ९४२१६८०००० | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, मुंबई उपनगर प्रशासकीय भवन ४था मजला आर सी चेंबुरकर मार्ग मुंबई.७१ |
| ३ | ठाणे | उज्ज्वला सपकाळे | ०२२ | २५३४१३५९ | ९८२३६७९९९७ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण ठाणे , ५ व मजला जिल्हाधिकारी इमारत, कोर्ट नका ठाणे (प)- ४००६०१ |
| ४ | पालघर | | | | | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, पालघर, |
| ५ | रायगड | श्री. खैरनार | ०२१४१ | २२२२८८ | ८३०८१०२३३८ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रायगड, |
| ६ | रत्नागिरी | ए.एस.बन्ने | ०२३५२ | २३०९५७ | ९४०३५८४३०४ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रत्नागिरी सामाजिक न्याय भवन कुवारबांब ता. रत्नागिरी-४१५६१२ |
| ७ | सिंधुदुर्ग | जे.एम.चाचरकर | ०२३६२ | २२८८८२ | ८९७५४४४२१० | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कलेक्टर कॉम्पलेक्स सिंधुदुर्ग नगरी, सिंधुदुर्ग-४१६८१२ |
| ८ | नाशिक | श्रीमती वंदना कोचुरे | ०२५३ | २२३६०५९ | ९४०३५१६९८२ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नाशिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नासर्डी पुलाजवळ नाशिक पुणे रोड नाशिक पिन- ४२२०११ |
| ९ | धुळे | श्रीमती वैशाली हिंगे | ०२५६२ | २४१८१२ | ९४०३४२८७४३ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण धुळे, जुने जिल्हाधीकार्यालय आवार धुळे |
| १० | नंदुरबार | राकेश महाजन | ०२५६४ | २१००२५ | ९०२८५५०४९७ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, तलाठी कॉलनी, ०१-ब, धुळे रोड नंदुरबार-४२५४१२ |
| ११ | जळगाव | श्री राकेश पाटील | ०२५७ | २२६३३२८ | ८२७५३२१२५८ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आकाशवाणी केंद्राजवळ जळगाव |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | अहमदनगर | माधव वाघ | ०२४१ | २३२९३७८ | ९८८१८३५४६४ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण ,अहमदनगर नालेगओन वातरंगे मळा अहमदनगर-४११००१ |
| १३ | पुणे | श्री अविनाश शिंदे | ०२० | २४४५६३३६ | ९१५८४०४९९९ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण पुणे, पी.एम. टी. बिल्डींग ,पहिला मजला जानकी सभागृह मागे स्वारगेट पुणे पिन-४११०३७ |
| १४ | सातारा | आर.ए.कदमपाटील | ०२१६२ | २३४२४६ | ९८२२४१८०५६ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, सातारा समाज कल्याण संकुल ,४०९/९ बसदरबझार ,सातारा. |
| १५ | सांगली | श्री. आर.एन. देवडे(प्र) | ०२३३ | २३७४७३९ | ९८२३८३७२४२ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,सांगली, जिल्हापरिषद आवार सांगली-४१६४१६ |
| १६ | सोलापूर | श्री नागेश चौगुले | ०२१७ | २७३४९५० | ८४८३८०४९२०, ७८७५३१८२०१ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,सोलापूर सात रस्ताजवळ,सोलापूर |
| १७ | कोल्हापूर | विजयकुमार गायकवाड | ०२३१ | २६५१३१८ | ९६७३००८०६० | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कोल्हापूर नविनप्रशासकीय इमारत पहिला मजला ब्लॉकन.६ जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालायशेजारी कसबा बावडा, कोल्हापूर |
| १८ | अमरावती | प्राजक्ता डी. इंगळे | ०७२१ | २६६१२६१ | ९६०४३१६७९७ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अमरावती , मोर्शी रोड, पोस्ट ऑफिसजवळ,शिवाजीनगर अमरावती. |
| १९ | बुलढाणा | एम.जी. वाट | ०७२६२ | २४२२४५ | ९४२१७७४४४२ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, बुलढाणा पार्लेवार यांची बिल्डींग वानखेडे लेआऊट वार्ड क्र.२० डॉ. भराड याच्या दवाखान्यासमोर, बुलढाणा. |
| २० | अकोला | शरद चव्हाण | ०७२४ | २४२६४३८ | ९६८९५७६४५८ ,७०५७१७९७१० | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अकोला नविन प्रशासकीय ईमारत अकोला. |
| २१ | वाशिम | एम.जी. वाट | ०७२५२ | २३५३९९ | ९४२१७७४४४२ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण वाशिम, प्रशासकीय इमारत दुसरा मजला कक्ष क्र.२१३ वाशिम |
| २२ | यवतमाळ | विजय साळवे | ०७२३२ | २४२०३५ | ९५२७४४६९५८ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यवतमाळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन दक्षता भवनामागे, दारव्हा रोड, यवतमाळ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २३ | नागपूर | एम. टी. वानखेडे | ०७१२ | २५५५१७८ | ९०११०१४८२० | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नागपूर,प्रशासकीय भवन, पहिला मजला ,उद्योग भवनाच्या बाजूला, सिव्हील लाईन नागपूर |
| २४ | वर्धा | बाबासाहेब देशमुख | ०७१५२ | २४३३३१ | ९८२२९२८१०५ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण वर्धा प्रशासकीय भवन, तळमजला जिल्हाधिकारी कार्यालय परिसर ,सिव्हील लाईन वर्धा. |
| २५ | भंडारा | देवसुदन धारगावे | ०७१८४ | २५२६०८ | ८८०६१२३५०५ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,भंडारा, वाघमारे बिल्डींग राजगोपालचारी वार्ड, भंडारा |
| २६ | गोंदिया | श्री.जाधव (प्र) | ०७१८२ | २३४११७ | ९९८७५६५४५५ | सहाय्यक आयुक्त समाज गोंदिया,कल्याण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधीकार्यालाया मागे गोंदिया. |
| २७ | चंद्रपूर | प्रसाद कुलकर्णी | ०७१७२ | २५३१९८ | ९०४९९९६५२० | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण चंद्रपूर,प्रशासकीय इमारत ,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कक्ष.क्र.१९ चंद्रपूर ४४२४०१ |
| २८ | गडचिरोली | श्री.विनोद मोहतुरे | ०७१३२ | २२२१९२ | ९४०५८६४३९० | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण गडचिरोली , गडचिरोली कॉम्प्लेक्स, गडचिरोली |
| २९ | औरंगाबाद | जलील शेख | ०२४० | २४०२३९१ | ९४०५७७१७७१ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,औरंगाबाद,शासकीय कला महाविद्यालय पाठीमागे किल्लेअर्क औरंगाबाद |
| ३० | जालना | श्रीमती संगिता मकरंद | ०२४८२ | २२५१७२ | ७८७५७५७८४० | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, जालना, जिल्हाधिकारी आवार, प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रिंगरोड , सर्वे न. ४८८, जालना. |
| ३१ | बीड | आर.एम. शिंदे | ०२४४२ | २२२६७२ | ९४०३९७०७७९ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड, डॉ.गिरी हॉस्पिटल समोर आदर्शनगर, बीड. |
| ३२ | परभणी | श्री.टी.एल. माळवदकर | ०२४५२ | २२०५९५ | ९४२२२०२६८९ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, परभणी, प्रशासकीय इमारत, परभणी. |
| ३३ | लातूर | एस.आर.दाने | ०२३८२ | २५८४८५ | ९७३०३५१९६४ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण लातूर,प्रशासकीय इमारत दुसरा मजला खोली क्र. २ ,लातूर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | नांदेड | श्री. बी.एन.वीर | ०२४६२ | २८५४७७ | ९८५००४००१० | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, नांदेड, राठोड बिल्डींग, टिळकनगर,नांदेड -४३१६०१. |
| ३५ | हिंगोली | सी. के. कुलाल | ०२४५६ | २२३७०२ | ९८२२७६३७१७ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, हिंगोली घर क्र. २० नारायणनगर , हिंगोली-४३१५३१ |
| ३६ | उस्मानाबाद | श्री रवींद्र कदम | ०२४७२ | २२२०१४ | ९०११०८३५४१ | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, प्रशासकीय इमारत, रूम न. ५ उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद . |

## प्रादेशिक समाज कल्याण अधिकारी पत्ते ,दूरध्वनी

| अ.क्र. | विभाग | अधिकारी नाव | एस.टी.डी कोड | कार्यालय दूरध्वनी | मोबाईल | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | श्री.एल.बी. महाजन | ०२० | २४४४५९२५ | ९४२३००८४५९ | प्रादेशिक समाज कल्याण विभाग पुणे,पी.एम. टी. बिल्डींग ,पहिला मजला जानकी सभागृह मागे स्वारगेट पुणे पिन-४११०३७ |
| २ | मुंबई | श्री.वाय. एस. मोरे | ०२२ | २७५७६८०५ | ९४२२८०८५०५ | प्रादेशिक समाज कल्याण विभाग मुंबई कोकण भवन ६वामजला सी.बी.डी. बेलापूर नवी मुंबई जिल्हा ठाणे पिन-४००६१४ |
| ३ | नाशीक | श्री.के. एन. गवळे | ०२५३ | २२३६०४८ | ९४२०३९४५०५ | प्रादेशिक समाज कल्याण विभाग नाशिक . डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नासर्डी पुलाजवळ नाशिक पुणे रोड नाशिक |
| ४ | औरंगाबाद | श्री.जितेंद्र वळवी | ०२४० | २३३१५३८ | ८८८८८०८३७२ | प्रादेशिक समाज कल्याण विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन मोना नाका दुध डेअरी जवळ औरंगाबाद. |
| ५ | अमरावती | श्री.दिपक वडकुते | ०७२१ | २५५०६८७ | ९९२३६८५७८१ | प्रादेशिक समाज कल्याण विभाग अमरावती डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन पोलीस आयुक्तालयाच्या पाठीमागे चांदूर रेल्वे स्टेशन अमरावती. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | लातूर | श्री.एल. आय. वाघमारे | ०२३८२ | २२३३७८ | ९४२३७१९४५१ | प्रादेशिक समाज कल्याण लातूर,<br>१ नं.चौक गणेश सुझुकी शोरूम पाठीमागे बार्शी रोड लातूर- ४१३५१२ |
| ७ | नागपूर | श्री.माधव झोड | ०७१२ | २५४६६५९ | ९९२१२५८९६७ | प्रादेशिक समाज कल्याण विभाग<br>प्रशासकीय इमारतक्र. २ , ३ मजला  सिव्हील लाईन नागपूर पिन -४००००१ |

## संबंधीत जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण यांचे ई-मेल दर्शविणारे विवरणपत्र

| Division | District | Email Address | Password |
|---|---|---|---|
| Amravati | Yavatmal | swadhar.swyavatmal@gmail.com | Pass@1234 |
| | Buldhana | swadhar.swbuldhana@gmail.com | Pass@1234 |
| | Akola | swadhar.swakola@gmail.com | Pass@1234 |
| | Washim | swadhar.swwashim@gmail.com | Pass@1234 |
| | Amravati | swadhar.swamravati@gmail.com | Pass@1234 |
| Aurangabad | Parbhani | swadhar.swparbhani@gmail.com | Pass@1234 |
| | Jalna | swadhar.swjalna@gmail.com | Pass@1234 |
| | Aurangabad | swadhar.swaurangabad@gmail.com | Pass@1234 |
| | Beed | swadhar.swbeed@gmail.com | Pass@1234 |
| Latur | Nanded | swadhar.swnanded@gmail.com | Pass@1234 |
| | Hingoli | swadhar.swhingoli@gmail.com | Pass@1234 |
| | Latur | swadhar.swlatur@gmail.com | Pass@1234 |
| | Osmanabad | swadhar.swosmanabad@gmail.com | Pass@1234 |
| Mumbai | Thane | swadhar.swthane@gmail.com | Pass@1234 |
| | Mumbai Suburban | swadhar.swmumbaisuburban@gmail.com | Pass@1234 |
| | Mumbai | swadhar.swmumbai@gmail.com | Pass@1234 |
| | Raigarh | swadhar.swraigarh@gmail.com | Pass@1234 |
| | Ratnagiri | swadhar.swratnagiri@gmail.com | Pass@1234 |
| | Sindhudurg | swadhar.swsindhudurg@gmail.com | Pass@1234 |
| | Palghar | swadhar.swpalghar@gmail.com | Pass@1234 |
| Nagpur | Wardha | swadhar.swwardha@gmail.com | Pass@1234 |
| | Nagpur | swadhar.swnagpur@gmail.com | Pass@1234 |
| | Bhandara | swadhar.swbhandara@gmail.com | Pass@1234 |
| | Gondiya | swadhar.swgondiya@gmail.com | Pass@1234 |
| | Gadchiroli | swadhar.swgadchiroli@gmail.com | Pass@1234 |
| | Chandrapur | swadhar.swchandrapur@gmail.com | Pass@1234 |
| Nashik | Nashik | swadhar.swnashik@gmail.com | Pass@1234 |
| | Ahmadnagar | swadhar.swahmadnagar@gmail.com | Pass@1234 |
| | Nandurbar | swadhar.swnandurbar@gmail.com | Pass@1234 |
| | Dhule | swadhar.swdhule@gmail.com | Pass@1234 |
| | Jalgaon | swadhar.swjalgaon@gmail.com | Pass@1234 |
| Pune | Solapur | swadhar.swsolapur@gmail.com | Pass@1234 |
| | Satara | swadhar.swsatara@gmail.com | Pass@1234 |
| | Kolhapur | swadhar.swkolhapur@gmail.com | Pass@1234 |
| | Sangli | swadhar.swsangli@gmail.com | Pass@1234 |
| | Pune | swadhar.swpune@gmail.com | Pass@1234 |

**DIVISIONAL**

| | | | |
|---|---|---|---|
| Division | Amravati | swadhar.div.amravati@gmail.com | Pass@1234 |
| Division | Aurangabad | swadhar.div.aurangabad@gmail.com | Pass@1234 |
| Division | Latur | swadhar.div.latur@gmail.com | Pass@1234 |
| Division | Mumbai | swadhar.div.mumbai@gmail.com | Pass@1234 |
| Division | Nagpur | swadhar.div.nagpur@gmail.com | Pass@1234 |
| Division | Nashik | swadhar.div.nashik@gmail.com | Pass@1234 |
| Division | Pune | swadhar.div.pune@gmail.com | Pass@1234 |